महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक ४ एप्रिल, २०१३
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)

(१) **श्री.सुरेश हाळवणकर,** श्रीमती प्रणिती शिंदे, सर्वश्री. रशीद ताहीर मोमीन, मुफ्ती मोहम्मद ईस्माईल अ. खलिक, ॲड.सदाशिवराव पाटील, श्री.अनिल गोटे, ॲड.चिंतामण वनगा, सर्वश्री प्रकाश शेंडगे, प्रमोद जठार, डॉ.सुरेश खाडे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आलेले असून दिनांक २ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वस्त्रोद्योग क्षेत्रातील यंत्रमाग कामगारांसाठी घरकुल योजना, कामगार कल्याण योजना, आरोग्य विमा योजना इत्यादी योजना संबंधित विभागाच्या सहाय्याने राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, सदर योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीकडून अद्यापही योजनेचा आराखडा तयार करण्यात न येणे, देशात सुरु असलेल्या यंत्रमाग उद्योगांपैकी ५०% पेक्षा जास्त उद्योग हे महाराष्ट्र राज्यात भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी, सोलापूर, विटा, सांगली या ठिकाणी असून त्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या २५ ते ३० लाखांच्या आसपास असणे, या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना मिळणाऱ्या अल्प मजुरीमुळे इचलकरंजी येथे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१३ मध्ये केलेला ४० दिवसांचा संप, त्यामुळे सुमारे १ महिना उद्योग बंद राहिल्यामुळे झालेले सुमारे २ हजार कोटी रूपयांचे नुकसान, या बंद दरम्यान मा.कामगार मंत्री यांनी यंत्रमाग कामगारांना बांधकाम व्यवसायातील कामगारांच्या धर्तीवर सुतावर सेस लावून कल्याणकारी मंडळाची स्थापना करून विविध योजनांचा लाभ देण्याची केलेली घोषणा, यंत्रमाग उद्योगातील कामगारांच्या हिताकरिता स्वतंत्र कायदा निर्माण करणे, त्यांना भविष्य निर्वाह निधी, ई.एस.आय.चा लाभ, किमान वेतन कायद्याची पुनर्रचना, निवृत्ती वेतन, वैद्यकीय सुविधा देण्याबाबतच्या मागण्या गेली अनेक वर्ष प्रलंबित असणे, त्यामुळे यंत्रमाग कामगारात शासनाविषयी निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड.अशोक पवार,** सर्वश्री रमेश थोरात, चंद्रशेखर घुले, वल्लभ बेनके, दिपक चव्हाण, कृषिभूषण साहेबराव पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे जिल्ह्यातील डिंभे धरणाच्या जलाशयातून आंबेगाव व शिरुर तालुक्यातील शेती सिंचनासाठी सुमारे ११६ कि.मी. लांबीचा उजवा कालवा काढण्यात येणे, या कालव्याच्या सुरुवातीच्या साठ किलोमीटरचा लाभ आंबेगाव तालुक्यातील मंचर, पोंदेवाडी परिसराला होणे, ६० ते ११६ कि.मी. हा भाग शिरुर तालुक्यात येणे, मात्र निमगाव भोगी गावाच्या पुढे आजपर्यंत या कालव्याचे पाणी गेलेले नसणे, कर्डेलवाडी व सरदवाडीजवळ ज्यांच्या जमिनीतून हा कालवा जातो त्यांना भरपाई न मिळाल्याने भूसंपादन प्रक्रियेअभावी कालव्याचे काम ठप्प असणे, उर्वरित भागात संपूर्ण खोदाईचे काम पूर्ण झालेले असणे, निमगाव भोगीच्या पुढे पाणी येऊ न शकल्याने दोन हजार हेक्टर क्षेत्र डिंभेच्या पाण्यापासून वंचित असणे, संपादन न करताच डिंबा उजव्या कालव्याचे खोदकाम झाल्याने या जमिनीचा वापर करता न येणे, नुकसानभरपाई नाही, पाणी नाही आणि जमिनीचा वापरही नाही अशी अवस्था येथील शेतकऱ्यांची होणे, या कालव्याद्वारे आंबेगाव तालुक्यातील ८,६६१ हेक्टर व शिरुर तालुक्यातील ६,९०७ हेक्टर म्हणजे एकूण १५,५६८ हेक्टर सिंचनक्षेत्र निर्माण होणार असणे, आतापर्यंत आंबेगाव तालुक्यात ८,११३ हेक्टर व शिरुर तालुक्यातील ३,८७५ हेक्टर म्हणजे एकूण ११,९८८ हेक्टर सिंचन निर्मिती झाली असणे, उर्वरित ३,५८० हेक्टर सिंचन निर्मिती करणे बाकी असणे, डिंभे उजव्या कालव्याच्या वितरण व्यवस्थेची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी रु. २४ कोटी निधीची तसेच उर्वरित मातीकामे व बांधकामे पूर्ण करण्यासाठी रु. ४.५० कोटी निधीची आवश्यकता असणे, कुकडी प्रकल्पाच्या रु. २१८४ कोटी किंमतीच्या तृतीय सुधारित अहवालास शासनाची प्रशासकीय मान्यता मिळत नसल्याने निधी प्राप्त होण्यात अडचणी येत असणे, त्याचबरोबर चासकमान प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचा लाभ शिरुर व खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना होणे, चासकमान प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी १४४ कि.मी. असणे, एकूण लांबींपैकी फक्त १५ कि.मी. लांबीचे अस्तरीकरणाचे काम पूर्ण झालेले असणे, डाव्या कालव्याच्या शिरुर तालुक्यातील डी.वाय १२ ते डी.वाय २४ दरम्यान अनेक ठिकाणी कालवा विमोचक व त्याच्या पोटचऱ्यांची कामे अपूर्ण असल्याने शेतकरी पाण्यापासून वंचित राहणे, चासकमान डाव्या कालव्याची अपूर्ण कामे पूर्ण झाल्यास शिरुर तालुक्यातील २७ गावांमधील १० हजार हेक्टर क्षेत्र नव्याने ओलिताखाली येणार असणे, चासकमान प्रकल्पाच्या व कुकडी प्रकल्पाच्या तृतीय सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता शासन स्तरावर तीन वर्षांपासून प्रलंबित असणे, चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामांसाठी ३०.०० कोटी रुपये निधी उपलब्ध होणेबाबत व डिंबा प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी २५.०० कोटी रुपये निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री अशोक जाधव,** प्रशांत ठाकूर, जगन्नाथ शेट्टी, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्याचे नवे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले असणे, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, मुंबईपर्यंत औद्योगिक कॉरिडोर स्थापन करण्याची कल्पना मांडण्यात येणे, कोकणासाठी

गत दहा वर्षात केवळ घोषणाच केल्या असणे, कोकणासाठी पाच हजार कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर करण्यात येणे, यापैकी जेमतेम ५० कोटी रुपये खर्च झालेले असणे, बंदर विकास, सिंचन विकास, उद्योग आदी अनेक क्षेत्रातील ज्या योजना आहेत त्या तशाच प्रलंबित असणे, गेल्या वीस वर्षात केवळ तिलारी हाच एकमेव पाटबंधारे प्रकल्प पूर्ण झाला असून उर्वरित सुमारे ७० लहान आणि मध्यम पाटबंधारे प्रकल्प अद्याप अपुरे असणे, त्यासाठी निधी मिळत नसणे, बंदर विकासाची एकही योजना सुरु झालेली नसणे, चौगुले कंपनीने नव्या सुसज्ज बंदराचा प्रारंभ जयगडला केला असणे, शासनाने विजयदूर्ग बंदराच्या विकासासाठी केलेला सामंजस्य करार अद्याप अंमलात येत नसणे, रेडी रेवस किनारा महामार्ग अद्याप पूर्ण नसणे, कोकणाचा औद्योगिक विकास साधण्यासाठी कोकणातील प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर)

चार : सन २०१३ - २०१४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (चौथा दिवस).

(१) वित्त विभाग.

(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

(३) नियोजन विभाग.

(४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)

पाच : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :- गत सत्रातील प्रलंबित (सूचना क्रमांक १ ते ४)

(१) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिकरणामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदुषणात देशात चौथ्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आलेला असणे, प्रदुषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या नियमांचे उद्योजकांकडून उल्लंघन होत असल्यामुळे प्रदुषणात दिवसेंदिवस भर पडत असणे, सांडपाणी व्यवस्थापन होत नसल्यामुळे दूषित पाणी रस्त्यावर येवून लगतच्या शेतात व नाल्यात जात असणे, जड वाहनांकरीता ठरवून दिलेल्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात प्रदुषणात भर पडत असून रस्ते खराब होत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदुषणाला आळा घालणे अत्यंत गरजेचे असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(२) **श्री.विजयराज शिंदे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यभरातील देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी ज्या इनामदारांना देण्यात आल्या होत्या त्या जमिनी बहुतांश ठिकाणी मूळ इनामदारांकडे नसणे, सदर जमिनीवर इतरांनी अवैधपणे कब्जा केलेला असून काही ठिकाणी तर सात-बारा व महसूल दप्तरात नियमबाहय नोंदी केलेल्या असणे, देवस्थान वर्ग ३ चे मूळ इनामदार यामुळे त्यांच्या हक्कापासून वंचित होणे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, त्यांचेवर उपासमारीची आलेली वेळ, इनामदारांना शासनाचे कोणतेही संरक्षण नसल्याने सद्य:स्थितीत ज्या जमिनी मूळ इनामदार किंवा त्यांच्या कुटुंबियांकडे आहेत त्या जमिनीही हडप करण्याचे इतरांनी चालविलेले प्रयत्न, देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनीव्यतिरिक्त इतर इनाम जमिनी जसे (देशमुख, देशपांडे, महार व इतर) इनाम जमिनी खालसा करुन शासनाने त्या त्या इनामदारांना किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी हक्काने दिलेल्या असणे, त्याचप्रमाणे देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी खालसा करुन मूळ इनामदार किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात असलेल्या विपुल वनसंपदेचा योग्य वापर करत राज्यात वनांवर आधारित उद्योगांची निर्मिती करण्याची नितांत आवश्यकता, मध, काथ, डिंक, चारोळी, मोह, पळस आदींच्या माध्यमातून उद्योगांची निर्मिती करुन बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची गरज, छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात वनांवर आाधारित उद्योगांची निर्मिती करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाबाबत वर्षांनुवर्षे होऊनही कोणतीही प्रगती झाली नाही, त्रुटी दूर करुन सन २००९ मध्ये ७२० कोटी रुपयांचा आराखडा परत सादर करण्यात आला आहे, पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प राबविण्याचे निश्चित होत आहे, राज्य व केंद्राचा निधी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाची परवानगी व रेस्क्यु सेंटरला सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीची प्रतिक्षा आहे, विदर्भाचा भौगोलिक व वनसंपदेचा विस्तार लक्षात घेता व्यावहारिक दृष्टया यशस्वी होणाऱ्या प्रकल्पाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष."

(दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक ५ व ६)

(५) **श्री. विजय घोडमारे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ट्रान्सप्लांट युनिट ३ वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, किडणी स्टोनच्या उपचारासाठी असलेले लिथोट्रिप्सी मशिन तंत्रज्ञाअभावी बंद असणे, मेयो आधुनिकीकरणाची प्रक्रिया मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या वर्षी मेयोचा अपेक्षित विकास न झाल्याने एम.बी.बी.एस.च्या ४० जागा कायम रद्द होण्याचा संभाव्य धोका टाळण्यासाठी विकास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मेयो प्रशासनाने वैद्यकीय संचालनालयाकडे पत्र देणे, मेडीकल प्रशासन कॅन्सरग्रस्तांच्या बाबतीत उदासीन असल्याने प्रतिक्षा यादी मोठ्या प्रमाणात वाढणे, रेडिओथेरपी तंत्रज्ञांची कमतरता असणे, राज्यात नागपूर येथे एम.डी. रेडिओथेरपी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, या अभ्यासक्रमाकरिता यंत्र सामुग्रीची पूर्तता केलेली नसणे, संस्थेतील कोबाल्ट यंत्रही जुने झाल्याने क्षमता ५०% पेक्षा कमी झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(६) **श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"भटक्या व विमुक्त (धनगर) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गठीत रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात विलंब होणे, राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे दीड करोड असून ९०% लोकांकडे हक्काची जमीन नसणे, धनगर समाजाला विकासाअभावी शासकीय योजनांचा फायदा मिळू न शकणे, तसेच कायदेशीर व्यवसाय नसल्याने समाज गुन्हेगारीच्या चक्रात फसणे, धनगर समाज सर्वात गरीब, निरक्षर आणि वंचित घटक असून ९८% लोक बेघर व भूमिहीन असणे, त्यामुळे धनगर समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

(दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक ७ व ८)

(७) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे या मूळ उद्देशातून राबविण्यात येत असलेले सर्व शिक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी करार

कर्मचारी विषयतज्ञ (साधनव्यक्ती) यांनी अहोरात्र परिश्रम घेणे, राज्यभरात या योजनेअंतर्गत कंत्राटी पध्दतीने सुमारे २० हजार कर्मचारी कार्यरत असणे, राज्यात कंत्राटी पध्दतीने ६-६ महिने कालावधीत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदर कर्मचारी गत १२ वर्षांपासून कार्यरत असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी प्रलंबित असणे,राज्यातील सर्व करार कर्मचारी हे उच्च शैक्षणिक अर्हताधारक असून कामाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना असणे, सदर करार कर्मचाऱ्यांची नियुक्ती गुणवत्ता तसेच बिंदुनामावली नुसार शासकीय भरती प्रक्रियेच्या विहित नियमावलीप्रमाणे जिल्हा निवड समितीमार्फत विविध पदांवर करण्यात येणे, राज्यातील बऱ्याच सुशिक्षितांनी या प्रकल्पात काम करताना शासकीय सेवेसाठीची विहित वयोमर्यादा ओलांडणे, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार सर्व शिक्षा अभियानातील उत्तम कार्याबद्दल महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असल्याचे जाहीर असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याच्या मागणीकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष."

(८) **श्री. संजय भेगडे , वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त्या करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, कृषी पदवी, पदविका उत्तीर्ण तसेच उच्चशिक्षित असलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागणे, नियोजन विभागाच्या दिनांक २ मे २०११ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामरोजगार सेवकांचे काम अर्धवेळ स्वरूपाचे असेल असे नमूद असतानाही त्यांना रात्रंदिवस काम करावे लागणे, वाढत्या महागाईच्या काळात त्यांना केवळ सव्वादोन टक्के कमिशनवर कुटुंबाची गुजराण करावी लागणे व त्यांना आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, त्यांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार शासनसेवेत सामावून घेण्यात यावे या व अन्य मागण्या शासनदरबारी प्रलंबित असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(मंगळवार, दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्रमांक ९ व १०)

(९) **श्री.सुधीर पारवे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर सुधार प्रन्यासाने आरक्षित केलेले भूखंड आरक्षणातून वगळण्याचा अधिकार नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींना असूनसुध्दा आरक्षित भूखंड मोकळे केलेले नसणे, नागपूर येथील नो शॉपिंग स्ट्रीट सारख्या अव्यवहार्य योजनांमुळे विकासात निर्माण झालेला अडसर, २२ ले आऊटचा प्रस्ताव प्रलंबित असणे, नागपूर शहरातील ५७२ व १९०० ले आऊट मधील विकास कामे अपूर्ण असणे, अनेक ले आऊटची विकास कामेच सुरु झालेली नसणे, नागरी सुविधांअभावी रहिवाश्यांची गैरसोय होत असणे, नागपूर सुधार प्रन्यासाने वर्षभरात गुंठेवारी अंतर्गत एकही अभिन्यास मंजूर न करणे, वर्धा रोडवरील गैरकृषी वापराची परवानगी गावठाणापासून ७५० मीटरवर देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"सूरजकुंड (हरियाणा) मेळाव्याच्या धर्तीवर राज्यात देखील सूरजकुंडसारखा सर्व सुखसोयीनी युक्त असा शिल्पग्राम प्रकल्प राबविण्याबाबत मौ.मजासगांव ता.अंधेरी येथील न.भू.क्र.१९०/ब मधील मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेला भूखंड महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत दिनांक ३१ जुलै, २००७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना विनंती करणे, उक्त जमिनीचे मनोरंजनाचे मैदान (आर जी) म्हणून असलेले आरक्षण बदलून ते शिल्पग्राम करणेबाबतचा प्रस्ताव महामंडळातर्फे दिनांक २४ ऑगस्ट, २००७ रोजीचे पत्रान्वये नगरविकास विभागास सादर करण्यात येणे, या योजनेसाठी १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निधी प्राप्त झाल्याचे २९ ऑगस्ट, २००७ रोजीच्या पत्रान्वये कळवूनही अद्याप जागेच्या आरक्षणाबाबत कोणताच निर्णय झालेला नसणे, सदर जमीन अद्याप महामंडळाच्या ताब्यात मिळालेली नसल्यामुळे पुढील कार्यवाहीस विलंब होणे, उपरोक्त प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होवून तीन-चार वर्षाचा कालावधी उलटूनही केवळ जागेअभावी शिल्पग्रामचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सदर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू होण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३ एप्रिल, २०१३.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.